# एसएसबीटीत सायबर सुरक्षेवर मार्गदर्शन

**प्रतिनिधी** | जळगाव

महाराष्ट्र सायबर सेल आणि क्विक हील फाउंडेशन आयोजित सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या कार्यक्रमांतर्गत एसएसबीटी महाविद्यालयात सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विद्यापीठाच्या संगणक शास्त्र प्रशाळेचे विद्यार्थी राजश्री कापुरे व आशिष पाटील यांनी समन्वयक प्रा. राजू अमले यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर सुरक्षेबाबत २०० विद्यार्थ्यांना माहिती दिली. यात सायबर क्राइम कसा होतो, सायबर क्राइम रोखण्यासाठी व सायबर क्राइम झाला तर काय करावे याबद्दल माहिती दिली. तसेच प्राचार्य जे. के. पटनायक यांनी देखील मार्गदर्शन केले.



एसएसबीटीत सायबर सुरक्षेवर माहिती देताना राजश्री कापुरे, आशिष पाटील.